
अभिसरण
ISSN: 2229-4856

# स्वामी विवेकानंद
## चिंतन आणि चर्चा

संपादक
प्राचार्य डॉ. वसंत सानप
डॉ. गणेश मोहिते



14.

# स्वामी विवेकानंद यांचे शिक्षण विषयक विचार

प्रा. डॉ. राजेंद्र ठाकरे

पारतंत्र्याच्या शृंखलांनी बध्द झालेल्या भारतीय जनतेच्या मनात भारतीय धर्म, संस्कृती, आचार-विचार व परंपरा यांचा दीप प्रज्वलीत करणारे, मरगळलेल्या भारतियांच्या नसा-नसात चैतन्य निर्माण करून त्यांना स्वदेश, स्वधर्म व स्वत्वाची जाणीव करून देणारे, दारिद्रय व अज्ञानाच्या महानिद्रेतून भारतियांना जागे करणारे, भारतीय तत्त्वज्ञानाची भव्य व उदात्त बैठक सर्वांना पटवून देणारे "माणूस " निर्माण करणे हेच साऱ्या शिक्षणाचे खरेखुरे ध्येय आहे हे सांगणारे भारतीय थोर पुरूष म्हणजे विवेकानंद होत.

विवेकानंदांचे मूळ घराणे बंगालमधले. सारस्वत समाजातील एक प्रसिध्द घराणे म्हणून ते ओळखले जाई. विवेकानंदांचे वडील दत्त. ते देखील प्रसिध्द वकील होते. . विवेकानंदांच्या आईचे नाव भुवनेश्वरी. १२ जानेवारी १८६३ रोजी भुवनेश्वरीला पुत्रलाभ झाला. त्याचे नाव नरेंद्र दत्त ठेवले. नरेंद्र अत्यंत हूड वृत्तीचा होता. तथापि आईच्या धार्मिक संस्कारांचाही त्यांच्यावर अधिक पगडा होता. खेळामध्ये तो खुप तरबेज होता. नरेंद्रचे वडील वकील असल्यामुळे सर्व जाती-जमातीचे व धर्मांचे लोक घरी येत - जात असत. त्यामुळे सर्व जाती-जमातींचे व धर्मांचे लोक घरी येत- जात असत. त्यामुळे सर्व जाती-जमातीची माणसे म्हणून सगळी सारखीच ही समतेवरील नरेंद्रची निष्ठा बळावत गेली.

नरेंद्रचे शिक्षण त्याच्या वयाच्या पाचव्या वर्षीच कलकत्ता येथील मेट्रोपॉलिटन स्कूलमध्ये सुरू झाले. पण हळू हळू शाळेतील चार भिंतीमध्ये सूरू असलेल्या शिक्षण पध्दतीला नरेंद्रचे मन विटून गेले. त्यामुळे शाळेच्या कृत्रिम वातावरणाचा त्याग करून नैसर्गिक वातावरणाकडे त्याचे मन ओढ घेऊ लागले. उच्च शिक्षण घेत असताना हर्बाट स्पेन्सर व जॉन स्टुअर्ट मिल यांच्या तत्त्वज्ञानाचा नरेंद्रवर फार प्रभाव पडला. याशिवाय वर्डस्वर्थ व शैले या कवींच्या कवितांचीही त्यांच्या मनावर विशेष छाप पडली. विशेषतः नरेंद्रची तत्त्वज्ञान या विषयातील प्रगती पाहून त्यावेळचे प्रेसिडेंसी कॉलेजचे प्राध्यापक हेस्टी यांनी "एक तत्त्वज्ञ विद्यार्थी " म्हणून नरेंद्रचा गौरव केला. अशा तऱ्हेने यावेळी मानवी जीवनाकडे जाणतेपणाने पहाण्याचा दृष्टीकोनाचे बीजारोपण झाले.

शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा आविष्कार होय अशी विवेकानंद शिक्षणाची व्याख्या करतात. प्रत्येक माणसातील सुप्त शक्तीचा पूर्ण विकास झाल्याशिवाय त्याच्यातील दैवी शक्तीला वाटच मिळत नाही. आणि म्हणून

विवेकानंद धर्मालाच शिक्षणाचा खराखुरा गाभा मानतात. असा हा धर्म म्हणजे परंपरागत संतांनी सांगितलेला भक्तीमार्ग नसून दीन दुबळयांची सेवा हाच धर्म अशी विवेकानंदांची धारणा होती. रूढी, अंधश्रध्दा व अज्ञान यांचे कवच फोडून निखळ मानव सेवेतच धर्म सामावलेला आहे आणि असा हा धर्म आणि शिक्षण यांत काहीच भेद नाही. त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. श्रेष्ठ धर्म म्हणजे सेवाधर्म आणि धर्माची जाणीव शिक्षणाच्या माध्यमातूनच होते. माणसाच्या जीवनाला सुसंघटित करणाऱ्या त्याला, "माणूस " घडविणाऱ्या व शील बनविणाऱ्या विचारांनाच शिक्षण म्हणावे लागेल. विवेकानंदांच्या शिक्षणविषयक विचारांना व्यापक अधिष्ठान आहे. करूण किंकाळया तुम्हाला ऐकू येतात का? तुम्ही या करूण किंकाळयांचे दु:ख निवारण करू शकता ? अर्थात जे शिक्षण सामान्य माणसाला जीवन संग्रामासाठी कटिबध्द करू शकत नाही, जे शिक्षण माणसांच्या मनात दयाभाव निर्माण करून शकत नाही व जे शिक्षण सिंहसाहस निर्माण करू शकत नाही : ते शिक्षण या संज्ञेला पात्रच नाही आणि म्हणूनच प्रत्येक माणसाला आपल्या पायावर उभे करणारे, स्वाभिमानाने जगण्याचा पाठ देणारे व जीवनातील अनेक आपत्तींना तोंड देण्याचे सामर्थ्य निर्माण करणारे शिक्षण खरे शिक्षण होय.

सर्व शैक्षणिक उपक्रमांचे ध्येय माणूस निर्माण करणे हेच असले पाहीजे. असा विवेकानंदाचा ठाम विश्वास होता. ज्यामुळे माणसांचे शील संवर्धन होते. मानसिक शक्तीमध्ये वाढ होते. बुध्दीचा चौफेर विकास होतो व जेणेकरून मनुष्य स्वत:च्या पायावर उभा राहतो. अशाच प्रकारचे शिक्षण विवेकानंदांना अभिप्रेत होते. परकिय भाषेचे विचार तोंडपाठ करावेत, त्याच्या बळावर विद्यापीठाच्या परीक्षेत उज्वल यश प्राप्त करावे. त्यानंतर कोठे तरी कारकून किंवा मॅजिसट्रेट व्हावे, एवढेच काही शिक्षणाचे ध्येय नाही.

सुप्त शक्तीचा पूर्ण अविष्कार म्हणजे शिक्षण होय. या विवेकानंदांच्या विचारात शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचे सार सामावलेले आहे. गारगोटीमधील अव्यक्त अग्निस्फूल्लिंगाप्रमाणे माणसाच्या मनातही ज्ञानकण लपलेले असतात. न्युटनने शोधून काढलेला गुरूत्वाकर्षणाचा नियम काही न्यूटनचीच कोठे वाट बघत थांबला नव्हता. झाडावरील एक फळ जमिनीवर पडणे, ते न्यूटनने पाहणे, आधिपासूनच मनात असलेल्या विचारांनी सुव्यवस्थित मांडणी करणे व त्यातूनच एखाद्या चिरंतन विचारांचा दूवा निर्मान होणे यालाच आपण न्यूटनच्या गुरूत्वाकर्षणाचा नियम म्हणतो.

सर्व शिक्षणाचे खरेखुरे सार म्हणजे मनाची एकाग्रता होय, असे विवेकानंदांचे मत होते. तेव्हा एकाग्रता ही ज्ञानसाधनेची गुरूकिल्ली आहे, असे त्यांना वाटते, देहभान विसरून प्रयोगशाळेत काम करणारा शास्त्रज्ञ घ्या, ज्ञानप्राप्तीसाठी झटणारा

विद्यार्थी घ्या, संशोधनकार्यात रस घेणारा प्राध्यापक घ्या किंवा रंगसंगतीमधून सुंदर चित्रांची निर्मिती करणारा चित्रकार घ्या, या सर्वांच्या नवनिर्मितीच्या मुळाशी एकाग्रता आढळून येते. अशा या एकाग्रतेची तीव्रता जेवढी अधिक तेवढी त्या कामातील सुलभता अधिक, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये यशप्राप्तीची पहिली पायरी म्हणून एकाग्रतेचे स्थान स्पष्ट करताना विवेकानंद म्हणतात, माझ्या मते शिक्षणाचे खरे सार आहे मनाची एकाग्रता, आणि चारित्र्य संवर्धनाला शिक्षणामध्ये फार मोठे महत्त्व आहे, असे विवेकानंद मानतात. शिक्षण प्रक्रियामध्ये प्रत्येक विचार विद्यार्थ्यांच्या मनावर एक संस्कार उमटवित असतो. असे संस्कार जाणिवेच्या पृष्ठभागावरच जाऊन पोहचतात. अशा संस्काराच्या समष्टितूनच त्याचे चारित्र्य आकार घेत असते. चुकांच्या मंथनातून नवविचारांचे नवनीत काढून आपणच आपला उध्दार करावयास शिकले पाहिजे, असे विवेकानंदांचे मत होते. आणि म्हणून केवळ बौध्दिक विकास म्हणजे शिक्षण नसून शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या मनात व्यापक सहानुभूती व मानवाबद्दल प्रेम निर्माण करणे हेच खरेखुरे शिक्षण आहे. अशा शिक्षणामधूनच चारित्र संवर्धन होणार आहे. एका व्यक्तिमत्त्वाचा दुसऱ्या व्यक्तिमत्त्वावर होत असलेला परिणाम म्हणजेच शिक्षण होय. अर्थात ही प्रक्रिया शाळेत व शाळेबाहेर सतत चाललेली असते. आणि म्हणूनच शाळेत घडून येणारी प्रक्रिया जेवढी म्हणून प्रभावी असेल तेवढा तो विद्यार्थी सर्वांगीण तयारीचा बनू शकेल. यासाठी स्वामी विवेकानंद गुरूकूल पध्दतीचा अधिक आग्रह धरतात. स्वामी विवेकानंदांचे मतानुसार निःस्पृहता हा शिक्षकाचा सर्वश्रेष्ठ गुण होय. स्वार्थापोटी अनेक दुर्गूणांचा उदय होतो. म्हणून तर शिक्षकांनी निःस्वार्थपणे अध्यापन केले पाहिजे. ग्रंथांचे अचूक आणि मौलिक ज्ञान ग्रहण करून ते सहज व सोप्या शब्दांमध्ये मांडण्यामध्येच श्रेष्ठ शिक्षकाचे रहस्य सामावलेले आहे. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षकाचे निष्कलंक चारित्र्य होय. शिक्षक ह्रदयाने जर पवित्र असेल तरच त्याच्या शब्दाला तेज प्राप्त होईल. अन्यथा पापग्रस्त शिक्षक स्वतःच्या व इतरांच्या अधःपतनालाच कारणीभूत होईल.

**शिक्षणः** "आचार्य देवो भव" या भावनेने आपल्या ह्रदयामध्ये गुरूबद्दल श्रध्दा व विनय बाळगणारा विद्यार्थीच आपल्या अध्ययनात प्रगती करू शकतो. विद्यार्थ्यामध्ये ज्ञानोपासनेची खरीखुरी लालसा पाहिजे. मनाचे पावित्र्य, आचार विचारांची शुध्दता, कष्ट करण्याची जिद्द, ज्ञानाची तीव्र पिपासा, आत्मसंयम, विनयशीलता व सहनशीलता हीच आदर्श विद्यार्थ्याची गुणसंपदा होय. अशा आदर्श विद्यार्थ्यासंबंधी बोलताना विवेकानंद म्हणाले होते की, "मला एक हजार सुशिक्षित व संन्याशी विद्यार्थी द्या " या शब्दातून हेच स्पष्ट होते की, व्यक्ति-विकासापासून देश-विकासापर्यंत अशा सुशिक्षित व संन्याशी विद्यार्थ्यांची फळीच्या फळी आजही निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

**स्त्री शिक्षण:** स्वामी विवेकानंदांच्या मताप्रमाणे स्त्रियांचे सर्व प्रश्न शिक्षणामुळेच सुटू शकतील. शिक्षणामुळे स्त्रिया स्वावलंबी तर होतीलच, शिवाय शीलसंपन्न बनतील. अर्थात स्त्री शिक्षणास धार्मिक अधिष्ठान लाभावे असे विवेकानंदांना वाटते. त्यामुळे सीता, संघमित्रा, लिलावती, अहिल्याबाई, मीराबाई व झांशीची राणी लक्ष्मीबाई अशा थोर स्त्रियांच्या चरित्र कार्यातून सतत प्रेरणा मिळत राहील. यामधून स्त्रियांचे जीवन तर उन्नत होईल. तथापि त्यांचे सुपुत्रही देशाचे नाव अजरामर करतील. याकरीता आपल्या देशाची संस्कृती, ज्ञान, शक्ती व भक्ती यांनी उजळलेले साहित्य स्त्रिया जेव्हा वाचतील तेव्हाच आपल्या देशाच्या उज्ज्वल भवितव्याच्या दिशा उजळू लागतील. अशा या सुसंस्कृत व सुदृढ स्त्रियांच्या पोटी आलेली नररत्ने आपल्या देशाला ललामभूत ठरतील.

**लोकशिक्षण:** आपला देश ग्रामप्रधान आहे. खेडयापाडयांतील झोपडीत राहणारा आहे. अशा झोपडीतील समाज पिढयान्-पिढया अज्ञानी, अंधश्रध्दाळू व गरीब आहे. अशा या समाजाकडे सुशिक्षित वर्ग दुर्लक्ष करतो. हे एक घोर राष्ट्रीय पाप आहे, अशी विवेकानंदांची धारणा होती. लोकशिक्षणातून जणजागृती होणार व त्यामुळेच सर्व लोक संपन्नतेच्या दिशेने वाटचाल करणार म्हणून लोकशिक्षण लोकपरिवर्तनाचे साधन आहे. हे समजून घेऊन लोकांना त्यांच्या भाषेत, त्यांच्याशी मिसळून ज्ञान दिले पाहिजे. लोकशिक्षणासाठी लोकभाषेचाच उपयोग केला पाहिजे. आणि " लोकहो उठा, जागे व्हा. आणखी किती काळ तुम्ही झोपणार !!! " अशा जाणीवपूर्वक प्रयत्नातून जन-जागृतीचे कार्य झाले पाहिजे. गरीबीचा कलंक धुवून काढण्यासाठी गोरगरीबांच्या झोपडीपर्यंत शिक्षण गेले पाहिजे. गरीब शाळेकडे आले नाहीत तर आता शाळेने गरीबांकडे गेले पाहिजे. आपल्या येथील माणसे शरीराने सुदृढ आणि व्यवहार कुशल बनतील असे शिक्षण आपण दिले पाहिजे. अशा प्रकारे स्वामी विवेकानंदांचा विचार सर्वांगीण आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. भगत रा.तु. शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर
२. भगत रा. तु. स्वामी विवेकानंद उनि.
३. विवेकवाणी - (स्वामी विवेकानंदांची शिकवण, रामकृष्ण मठ, नागपूर)


❑❑❑